प्रश्नपेढी – सत्र ४– पेपर २

१. दादरच्या खाजगी क्लासेसमध्ये जाऊन राज्यघटना शिकवायचे असे विश्वासने का ठरवले?

अ. उत्कृष्ट बोलण्याचं कौशल्य आत्मसात करण्यासाठी

आ. पैसे कमावण्यासाठी

इ. राज्यघटनेचा सखोल अभ्यास होईल म्हणून

ई. क्लासेसच्या संचालकांनी विनंती केली म्हणून

२. गावी सगळेजण विश्वासला कोणत्या नावाने बोलवत ?

अ. विशा

आ. भाऊ

इ. भावड्या

ई. साहेब

३. विश्वासच्या मुलाखतीच्या पॅनलचे चेअरमन कोण होते ?

अ. लेफ्टनंट जनरल लक्ष्मीनारायण

आ. लेफ्टनंट जनरल सुरेंद्रनाथ

इ. मिसेस कुलकर्णी

ई. आय.पी.एस अधिकारी डी.डी.पॉलसन

४. खालीलपैकी कोणत्या महनीय व्यक्तीचा विश्वासच्या आयुष्यावर प्रभाव आहे

अ. छत्रपती शिवाजी महाराज

आ. नेल्सन मंडेला

इ. स्वामी विवेकानंद

ई. गौतम बुद्ध

५. विश्वास विक्रीकर निरीक्षक पदांच्या गुणवत्ता यादीत कितवा नंबर पटकावतो.

अ. पहिला

आ. दुसरा

इ. तिसरा

ई. नववा

६. एम.पी.एस.सी च्या मुख्य परीक्षेत विश्वासने कोणत्या विषयावरील निबंध लिहिला

अ. राष्ट्रीय एकात्मता

आ. युवकांपुढील आव्हाने
इ. महिलांची सुरक्षितता आणि सक्षमीकरण
ई. भारतातील स्वातंत्र्य लढ्याची चळवळ

७. कोणाच्या नोट्स वापरून विश्वासने मराठी साहित्य या विषयाचा अभ्यास केला
अ. विकास खारगे
आ. अविनाश धर्माधिकारी
इ. भास्कर भाऊ
ई. भूषण गगराणी

८. मित्र संजय देशमुख याने मुख्य परीक्षेसाठी कोणता विषय निवडावा असे विश्वासला सुचवले
अ. समाजशास्त्र
आ. राज्यशास्त्र
इ. मानसशास्त्र
ई. कृषिविज्ञान

९. एमपीएससीच्या मुख्य परीक्षेत प्रश्नांची उत्तरे कशी लिहायची याचे मार्गदर्शन विश्वासला कोणी केले
अ. उपजिल्हाधिकारी दीपक पाटील
आ. उपजिल्हाधिकारी जितेंद्र यादव
इ. पीएसआय कांबळे
ई. घोलकर सर

१०. कोणत्या स्पर्धा परीक्षेच्या मुलाखतीत विश्वासला अपयश येते
अ. यूपीएससी
आ. एमपीएससी
इ. विक्रीकर अधिकारी
ई. उपजिल्हाधिकार

११. विश्वासला इतिहास विषय शिकविणाऱ्या शिक्षकांचे नाव काय
अ. एकोंडे सर
आ. कापसे सर
इ. घोलकर सर
ई. दिगवडेकर सर

१२. विश्वासला बारावीला एकूण किती टक्के गुण मिळतात
अ. ९१ टक्के

आ. ७८ टक्के
इ. ८८ टक्के
ई. ८१ टक्के

१३.आत्मचरित्रात खालीलपैकी कोणचे वैशिष्ट्य नसते ते ओळखा.

अ)कथनात्मकता ब) गद्यात्मकता क)वर्णनात्मकता ड) कथात्मकता

१४.आत्मचरित्रकार खालीलपैकी कोणती गोष्ट करण्याचा प्रयत्न करत असतो ?

अ)प्रांजळ कथन ब) आत्मसमर्थन क)सत्यकथन ड)काल्पनिक कथन

१५.आत्मचरित्र हे एक रचित कथन का होते?

अ) कारण ते स्मृतीआधारे लिहिलेले असते

ब) कारण ते सत्यकथन असते

क) कारण स्वप्रतिमा उदात्त करण्याचा प्रयत्न होतो

ड)कारण त्यात निवडीला वाव नसतो

१६.खालीलपैकी कोणत्या संताने आपल्या अभंगातून आपले आत्मचरित्र थोडक्यात मांडले आहे ?

अ) संत ज्ञानेश्वर ब) संत नामदेव क) संत रामदास ड) संत तुकाराम

१७ कोणत्या संत कवयित्रीने आपले आत्मचरित्र अभंगातून मांडले होते ?

अ) संत मुक्ताबाई

ब) संत बहिणाबाई

क) संत जनाबाई

ड) संत सखूबाई

१८.दलित आत्मकथनांना खालीलपैकी कोणते विशेषण जोडले जाते ?

अ)सनसनाटी कहाणी

ब) पारदर्शक कथा

क) वेदनेच्या गाथा

ड)सूडाचे नाट्य

१९.मराठीतील प्रारंभीची स्त्रियांची आत्मचरित्रे कशी आहेत?

अ) स्त्रीचे कर्तृत्व सांगणारी

ब) स्त्रियांची वेदना व्यक्त करणारी

क) पतिकेंद्री

ड)घरगुती गप्पा सांगणारी

२०.चरित्र हा साहित्यप्रकार कोणत्या विषयाशी नाते सांगतो ?

अ) समाजशास्त्र ब) भूगोल क) इतिहास ड) राज्यशास्त्र

२१.उर्मिला पवार यांच्या आत्मकथनाचे नाव काय आहे ?

अ) बलुतं ब) आयदान क) अंतःस्फोट ड) मिटलेली कवाडे

२२.चरित्र हा साहित्यप्रकार कशावर अवलंबून असतो ?

अ) लेखकाच्या व्यक्तिमत्वावर

ब) प्राथमिक व दुय्यम चरित्र साधनांवर

क) चरित्रनायकाच्या थोरपणावर

ड) चरित्रनायकाच्या प्रामाणिकपणावर

२३.नीलम माणगावे यांच्या वडिलांना कोणता आजार झाला होता?

अ) हृदयविकार ब) मधुमेह क) अर्धांगवायू ड) संधिवात

२४. निलम माणगावे यांचे वडील बारा महिने कोणता पोषाख घालून बाहेर जात ?

अ) सदरा ब) कोट क) शर्ट ड) अंगरखा

२५.नीलम माणगावे यांना त्यांच्या शेजारच्या मुस्लिम स्त्रीने काय नाव ठेवले होते ?

अ) गुलाबजाम

ब) रसगुल्ला

क) लवंगी मिरची

ड) गुळाची ढेप

२६.गोठ्यातले एखादे जनावर मरत असताना नीलमची आई कोणता मंत्र त्याच्या कानात म्हणत बसे?

अ) गायत्री मंत्र ब) बाधामुक्ती मंत्र क) णमोकार मंत्र ड) गरूड मंत्र

२७.उपाध्यायांच्या घरचे अन्न नीलमने खाऊ नये असे तिच्या आईला का वाटे ?
अ) कारण ते शिळं असे ब) कारण ते नैवेद्याचे असे क) कारण ते निर्माल्याचे असे ड) कारण ते करणी केलेले असे

२८.कोणती कविता शिकवताना नीलमच्या पाचवीच्या शिक्षिका नंदाबाईंचे डोळे भरून येत ?

अ) राजहंस माझा निजला

ब) पोर खाटेवर मृत्यूच्याच दारा

क) घनतमी शुक्र बघ राज्य करी

ड) लाडकी बाहुली होती माझी एक

२९.कोणती बाई आपल्या आईपेक्षाही मनाने मोठी आहे असे नीलम माणगावे यांना लहनपणी वाटले होते ?

अ) लतीची खाऊ देणारी आई

ब) शेतात सापडलेल्या मुलाला आपलं म्हणणारी बाई

क) मीनाक्षीची छान कपडे शिवणारी आई

ड) खाटेवर बसून सगळी कामे मुलांकडून करून घेणारी बाई

३१.कोणती गोष्ट केल्यावर बाईंनी कौतुक केले तेव्हा नीलमला फार मोठा पराक्रम केल्यासारखे वाटले होते ?

अ)घड्याळात किती वाजले ते अचूक सांगितले

ब) सत्तावीसचा पाढा अचूक म्हटला

क) नारळ फोडला

ड) नदीत बुडणाऱ्या मुलीला वाचवले

३२.नीलमची आई धान्य पाखडताना नीलमला तिथून का उठवत असे ?

अ) डोळ्यात तुसं जातील म्हणून

ब) कोंडा केसांवर जाऊन चिकटेल म्हणून

क) नवऱ्याचे भय वाटणार नाही म्हणून

ड)तिने अभ्यास करायला हवा म्हणून

३३.मोरेंच्या मुलीच्या अंगात आलेलं पाहून नीलमला काय वाटले ?

अ) तिची भीती वाटली ब) तिचा राग आला क) तिचा हेवा वाटला ड) तिची काळजी वाटली

३४.सांगवड्याला ज्वालाच्या शाळेत आपल्याला आईने घालावं असे नीलमला का वाटले होते ?

अ) ज्वालासारखे धीट होता येईल म्हणून

ब) त्या शाळेत चरखे होते म्हणून

क) त्या शाळेच्यामागे तळं होतं म्हणून

ड) त्या शाळेत इंग्रजी चांगले शिकवत  म्हणून

३५.पोरगी नाही पोरगाच हाय तो माझा असं नीलमची आई हरेराम बाईला कधी म्हणाली होती ?

अ) नीलम पोहायला शिकली तेव्हा

ब) नीलम पदवीधर झाली तेव्हा

क)नीलमचे पुस्तक प्रकाशीत झाले तेव्हा

ड) नीलमचे लग्न झाले तेव्हा

३६.नीलमचे मामा तिच्या आईवर का चिडले होते ?

अ)नीलमने त्यांच्या खिशातले पैसे चोरले म्हणून

ब)नीलमने कबड्डी खेळात भाग घेतला म्हणून

क) नीलमने कॉलेजच्या नाटकात भाग घेतला म्हणून

ड) त्यांनी सुचवलेल्या स्थळाला नीलमने नाकारले म्हणून

३७.कोल्हापूरच्या यमनाआजीने दिलेली कोणती गोष्ट नीलमच्या कायम लक्षात राहिली ?

अ) साडी ब) पुरणपोळी क) उसळ ड) भजी

३८.नीलमला तिच्या कॉलेजमधील मुलांनी कोणत्या गोष्टीवरून त्रास दिला ?

अ) तिच्या नटवेपणावरून

ब) तिच्या उंचीवरून

क) तिच्या नावावरून

ड) तिच्या अशुद्ध भाषेवरून

३९. आत्मकथन हे आत्मचरित्रापेक्षा कोणत्या बाबतीत वेगळे असते ते ओळखा.
अ) आत्मकथन छोटे असते
ब) आत्मकथन स्त्रिया लिहितात
क) आत्मकथन सर्वसामान्य लिहितात
ड)आत्मकथन काव्यात्म असते
४०.बेबी कांबळे यांनी लिहिलेल्या आत्मकथनाचे नाव काय
अ) अंतःस्फोट
ब) जिणं आमचं
क) बंद दरवाजे
ड) मिटलेली कवाडे
४१.साधारणपणे दलित आत्मकथनात कोणते समान सूत्र दिसते ?
अ)पाल्हाळ, रडगाणे, कौफियत
ब) वेदना,विद्रोह, मानवता
क)सत्य, अहिंसा, अपरिग्रह
ड) प्रज्ञा, करूणा, शील
४२.आत्मचरित्र या साहित्यप्रकाराचे स्वरूप कसे असते ?
अ)वस्तुनिष्ठ
ब) स्वार्थी
क) आत्मनिष्ठ
ड) वर्णनात्मक
४३.चरित्र हा साहित्यप्रकार कोणत्य ज्ञानशाखेच्या परिघावरचा मानला जातो ?
अ) इतिहास ब) भूगोल क) समाजशास्त्र ड) मानसशास्त्र
४४.आत्मचरित्रकाराने कोणती शपथ मनोमन घ्यायची असते ?
अ)सत्य लपविण्याची
ब) असत्य सांगण्याची
क) सत्य तेच सांगण्याची
ड) अर्धसत्य सांगण्याची

४५.आठवणी,पत्रे ही चरित्रलेखनाची साधने कितपत विश्वासार्ह दर्जाची मानली जातात

अ) प्राथमिक दर्जाची

ब) दुय्यम दर्जाची

क) अजिबात दर्जा नसलेली

ड) श्रेष्ठ दर्जाची

४६.चांगला चरित्रकार चरित्रनायकाकडे कोणत्या दृष्टिकोनातून पाहत असतो ?

अ) त्याचा आदर्श नायक म्हणून

ब) भक्तीभावाने

क) भारावून

ड) निःपक्षपातीपणे

४७.चरित्रनायकाची वृत्ती कशी असावी लागते ?

अ) प्रामाणिक ब) संशयी क) अभिनिवेशी ड) संशोधक

४८.आत्मचरित्र सामान्यतः कोण लिहितात ?

अ) सर्वसामान्य व्यक्ती ब) असामान्य व्यक्ती क) अतिसामान्य व्यक्ती ड) राजकीय क्षेत्रातील व्यक्ती

४९.मराठीतील एक साक्षेपी चरित्रकार कोणते ते ओळखा

अ) विश्वास पाटील ब) द.न.गोखले क) लोकमान्य टिळक ड) गंगाधर गाडगीळ

५०.धनंजय कीर यांनी खालीलपैकी कोणत्या असामान्य व्यक्तीचे चरित्र  लिहिले आहे ?

अ) विठ्ठल रामजी शिंदे ब) जवाहरलाल नेहरूक) डॉ.बाबासाहेब आंबेडकर ड) महात्मा गांधी

५१.कुटुंबनियोजनाचे भारतातले पहिले समर्थक र.धों. कर्वे यांचे चरित्र कोणी लिहिले आहे ?

अ) द.न.गोखले ब) धनंजय कीर क) सु.रा.चुणेकर ड) य.दी.फडके

५२.बंध-अनुबंध हे आत्मचरित्र कोणी लिहिले आहे ?

अ) सुनिताबाई देशपांडे ब) रागिणी पुंडलिक क) कमल पाध्ये ड) सेनेहप्रभा प्रधान

५३.एक झाड दोन पक्षी हे आत्मचरित्र कोणी लिहिले आहे ?

अ) पु.ल.देशपांडे ब) भालजी पेंढारकर क) विश्राम बेडेकर ड) सलिम अली

५४.मराठीतले पहिले आत्मचरित्र कोणते?

अ) माझे पुराण ब) माझी कहाणी क) अरूणोदय ड) यमुनापर्यटन

५५.स्त्रिलिखीत आणि अतिशय चांगले असे मराठीतले आत्मचरित्र कोणते ?

अ) स्नेहांकित ब) स्मृतिचित्र क) रास ड) माझ्या जल्माची चित्तरकथा

५६. सांगत्ये ऐका हे आत्मचरित्र कोणत्या मराठी चित्रपट अभिनेत्रीचे आहे ?

अ) स्नेहप्रभा प्रधान ब) लीला चिटणीस क) हंसा वाडकर ड) जयश्री गडकर

५७.आत्मचरित्रात येणारा कोणता दोष आत्मकथनातही येऊ शकतो ?

अ) स्वसमर्थन ब) सत्यकथन क) प्रांजळ निवेदन ड) स्वतःच्या चुका कबुल करण्याची तयारी

५८.आत्मचरित्र लेखनामागे कोणते प्रयोजन असावे ?

अ) स्वतःची खोटी प्रतिमा निर्माण करणे

ब) आत्मपरीक्षण

क) वाचकांना उपदेश करणे

ड) वाचकांना स्वतःचा मोठेपणा सांगणे

५९.आत्मकथन लेखनामागे कोणते प्रयोजन असते ?

अ) स्वसमर्थन

ब) सनसनाटी कथा सांगणे

क) स्वतःच्या उपेक्षेची वेदना व्यक्त करणे

ड) स्वतःच्या प्रेमभंगाची कहाणी सांगणे

६०. आत्मकथने वेदनेच्या गाथा असतात तशीच यशोगाथाही असतात असे का म्हणतात ?

अ) कारण त्यात आत्मकथनकाराने जिंकलेल्या मैचेसबद्दल माहिती असते

ब) कारण त्यात आत्मकथनकाराच्या सफल प्रेमाची कहाणी असते

क) कारण त्यात आत्मकथनाकाराने धडपडून मिळवलेल्या शैक्षणिक यशाची कहाणी असते

ड) कारण त्यात आत्मकथनाकाराने मनावर विजय मिळवलेला असतो

६१. जगायचंय प्रत्येक सेकंद हे आत्मकथन कोणी लिहिले आहे ?
अ) बेबी कांबळे ब) सिंधूताई सपकाळ क) मंगला केवळे ड) उर्मिला पवार
६२.जसं घडलं तसं या  आत्मकथनात कोणती खंत व्यक्त झाली आहे ?
अ) पुरूषी व्यवस्थेने केलेल्या अन्यायाची
ब) शिक्षण अर्धवट राहिल्याची
क)शहरात येता नआल्याची
ड) नोकरी करता न आल्याची
६३.नीलम माणगावे यांच्या पणजोबांचे नाव काय होते ?
अ)बळीबा पाटील ब) पिराजी पाटील क) राघोबा पाटील ड) बाबासाहेब देशमुख
६४.नीलम माणघावे यांच्या वडिलांनी कोणता गुन्हा केला होता ?
अ)बायकोचा खून ब) आजोबांचा खून क) सावत्र आईचा खून ड)सासूचा खून
६५.नीलमच्या वडिलांचे खरे आई वडील कुठे राहात होते ?
अ) कोरोची ब) रूकडी क) सांगवडे ड) कोल्हापूर
६६. गरीबीमुळे नीलमच्या बालपणी त्यांना काय खाऊन दिवस काढावे लागले होते ?
अ) भाकरी ब)भोपळे क) कोंडा ड) कण्या
६७.तालमीतल्या मुलांनी राघोबाच्या वाड्यातील तरूण मुलींना त्रास देण्यासाठी कोणता प्राणी त्यांच्या घरात सोडला होता ?
अ) गाडव ब) कुत्रा क) माकड ड) उंदीर
६८.नीलमच्या आईचे स्वभाववैशिष्ट्य कोणते होते ?
अ) झाडांवर प्रेम ब) भांडखोर क) लाचार ड)प्राण्यांवर प्रेम
६९.नीलमला कोणती शाळा खूप आवडायची ?
अ) मारूती मंदिरातली ब) कोल्हापूरची क) तळ्याकाठची ड) माळावरची
७०.मदुरा– मीनाक्षीकडून नीलमने काय चोरले होते ?
अ) वही ब) पेन्सील क) प्लास्टिकची बटणे ड) पैसे
७१.नीलमच्या वाड्यात राहणाऱ्या हरेराम बाईंना कोणते काम फार आवडे ?
अ) शिकवणे ब)पुजा करणे क) शिवणकाम ड) शेतातले काम

७२. हरेराम बाई या नीलमच्या वाड्यातील भाडेकरू बाई कोणती नोकरी करून निवृत्त झाल्या होत्या ?

अ) शिक्षिका ब) परिचारिका क) साध्वी ड) कारकून

७३.नीलम माणगावे यांना आजही कोणत्या गोष्टीची चीड येते ?

अ) वडिलांच्या बेजबाबदार वृत्तीची

ब) शिक्षण पूर्ण न केल्याची

क) समाजाने स्त्रीकडे कायम बाई म्हणून पाहण्याची

ड) आईच्या भांडकुदळपणाची

७४.राघोबाच्या वाड्यातील राघोबा आणि त्यांचे दोन तरूण मुलगे कशामुळे दगावलेले असतात ?

अ) एनफ्लुएंझा

ब) करोना

क) प्लेग

ड) कॉलरा

७५.नीलमची कोणत्या खेळात भाग घेण्याची इच्छा लाज व भयामुळे पूर्ण झाली नाही ?

अ) खोखो ब) कबड्डी क) क्रिकेट ड) बॅटमिंग्टन

७६. नीलमच्या आईची धार्मिक पुस्तके वाचण्यामागची भूमिका काय होती ?

अ) ज्ञान मिळवणे ब) पुण्य मिळवणे क) वेळ घालवणे ड) वेळ घालविणे

७७.नीलमची आई नेहमी कोणत्या जैन धर्मातील मंत्राचा उच्चार करत असे ?

अ) जय अरिहंत ब) महावीराय नमः क) णमोकार मंत्र ड) गायत्री मंत्र

७८.मूल व्हावे म्हणून विश्वासच्या आईने कोणत्या देवाला नवस केला होता ?

अ०जीवदानी ब) जाखाई क) महालक्ष्मी ड) ग्रामदेवता नीनाई

७९.मन मे है विश्वास हे आत्मकथन लिहिण्यामागची प्रेरणा कोणती होती ?

अ) स्वचा शोध ब) स्वच्या विकासाचा प्रवास सांगणे क) आयुष्याचा मागोवा घेणे ड) तरूणांना मार्गदर्शन करणे

८०.काकांचे कोणते शब्द विश्वासला प्रेरणादायी वाटले होते ?

अ)ईश्वरावरविश्वास ठेवला की सर्व प्रश्न सुटतात

ब) न्यून गंड फेकून द्यावा, कशाची भीती बाळगू नये

क) आईवडिलांच्या आशीर्वादाने सर्व प्रश्न सुटतात

ड)शिक्षणाने आजवर कोणाचे भले केले आहे

८१.विश्वासचा कोणता बालमित्र गावात आलेल्या आधुनिक करमणुकीच्या साधनाच्या अतिरेकाचा बळी ठरला ?

अ)घनःश्याम पिसे ब) अब्दुल्ल्या क) गणा जाधव ड) राजकुमार

८२.नाताळचा सण कोणाशी संबंधित आहे असे विश्वासला लहानपणी वाटे ?

अ)गोरक्षनाथ ब) ज्ञानेश्वर क) मच्छेंद्रनाथ ड)नवनाथ

८३.शाळेत शिकत असताना विश्वास विद्यार्थी म्हणून कसा होता ?

अ)घाबरट, न्यनगंड असलेला

ब)अभ्यासात हुशार पण बिघडलेला विद्यार्थी

क)लाजाळू , मागे मागे रहणारा विद्यार्थी

ड)नम्र व प्रामाणिक विद्यार्थी

८४.विश्वासला त्याच्यातील नेतृत्वगुणाची कोणत्या शिक्षकाने करून दिली ?

अ)कदम बाई ब) दिगवडेकर सर क) सुतार गुरूजी ड) लाकोळे गुरूजी

८५.ध्येय तीच व्यक्ती गाठू शकते ज्याच्या स्वप्नामध्ये उमेद असते  हे प्रेरणादायी ठरलेले वाक्य विश्वासला कोणी सांगितले ?

अ) कदम बाई ब) लकोळे सर क) सुतार गुरूजी ड)दिगवडेकर सर

८६.खेड्यातील शिक्षकांचा कोणता गुण श्वासला महत्त्वाचा वाटतो ?

अ)हुशारी व बुद्धिमत्ता ब) व्यवहारज्ञान व सामान्यज्ञान क)विद्यार्थ्यांवरील प्रेम

८७.मराठवाड्यात विश्वासने कोणती कामे पोलिसांकरवी करून घेतली ?

अ) वृक्षारोपण ब) ग्रामस्वच्छता क) प्रौढ साक्षरता ड) रक्तदान

८८.हायस्कुलमध्ये शिकत असताना कोणत्या आदर्श युवकासारखे व्हावे असे विश्वासला वाटे ?

अ) शिवाजी महाराज ब) भूषण गगराणी क)डॉ.बाबासाहेब आंबेडकर ड) स्वामी विवेकानंद

८९.विश्वासने शिकून मोठे व्हावे हे कोणाचे स्वप्न होते ?
अ)आई ब) तात्या क) आजी ड) शिक्षक

९०.होस्टेलमध्ये विश्वासला छोटूदादा असे नाव का पडले ?
अ) त्याच्या लुना ऐटीत चालवण्यामुळे ब) त्याच्या दादागिरीमुळे क) त्याने मानकरला पट्ट्याने मारल्यामुळे ड)त्याच्या अभ्यासातील हुशारीमुळे

९१.स्पर्धापरीक्षा देण्याचा मंत्र विश्वासला कोणाकडून मिळाला?
अ) काका ब) शिक्षक क) भूषण गगराणी ड)वडीलांमुळे

९२.बॉलिवूडमध्ये सुपरस्टार बनलेला कोणता नट हॉस्टेलमध्ये विश्वासचा रूम पार्टनर होता ?

अ) आर. माधवन ब) आमिर खान क) राजपाल यादव ड) गोविंदा

९३.गावातील भरकटणारी तरूणाई आणि गटागटांतील राजकारण यावर तोडगा काढण्यासाठी विश्वासनेकाय केले ?

अ)गावकऱ्यांशी चर्चा करून समजावले ब) राळेगण सिद्धीला घेऊन गेला क) सामाजिक प्रश्नांवर व्याख्यानमाला ड) सामाजिक परिवर्तनाचे कार्यक्रम

९४.बी.ए.च्या दुसऱ्या वर्षाला असताना विश्वासला कोणत्या दोन स्पर्धांमध्ये पारितोषिके मिळाली

? अ)निबंध , हस्ताक्षर ब) गायन व समुह नृत्य क) नेमबाजी व वक्तृत्व ड) गोळाफेक व रनिंग

९५.कोल्हापूरला शिकत असताना विश्वास स्पर्धा परीक्षांचा अभ्यास कुठे बसून करे ?

अ) स्टडी सेंटर ब) ग्रंथालय क)ट्रेनिंग सेंटर ड) हॉस्टेलची खोली

९६.विश्वासने कोणत्या विषयात बी. ए. केले ?
अ) इतिहास ब) इंग्रजी क) राज्यशास्त्र ड)मराठी साहित्य

९७.विश्वासने एम.ए.ची पदवी कोणत्या विद्यापीठातून मिळवली ?
अ)पुणे ब) मुंबई क) शिवाजी विद्यापीठ ड) यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ

९८.एस. आय. ए. सी. म्हणजेच राज्य प्रशासकीय सेवा संस्थेत कोणत्या परीक्षांची तयारी करून घेतली जाते ?

अ) आय.पी.एस.सी, यु. पी.एस. सी

ब) संरक्षण दलात जाण्यासाठीची परीक्षा

क)पी.एस.आय. पदासाठीची परीक्षा

ड) निवडणूक आयोगातील पदासाठीची परीक्षा

९९.भीष्मराज बाम यांच्या कोणत्या वाक्याने विश्वासला वेळेचे नियोजन वअभ्यास करण्याची प्रेरणा मिळाली ?

अ) परिवर्तनाची सुरूवात स्वतःपासून केली पाहिजे

ब) जर तुम्ही यशस्वी होण्यासाठी नियोजन करत नसाल तर अपयशी होण्याची तयारी करत असता

क)वंचित समूहाला ज्ञान देण्यासाठी स्वतः ज्ञानी झाले पाहिजे

ड)वंचित समुहाचे हीत साधण्यास सिद्ध झाले पाहिजे

१००.स्पर्धा परीक्षेत प्रभावी उत्तरो लिहिण्यासाठी कोणता मंत्र विश्वासला सापडला ?

अ) उत्तरे तयार करून ठेवणे ब) उत्तरे लिहिण्याचा सराव करणे क) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर कोण , काय केव्हा,कोठे अशा संदर्भाने लिहिणे ड)उत्तरे लिहिताना स्वतःची भाषा वापरणे

१०१.विश्वासला शासकीय सेवेत का जायचे होते ?

अ)आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी

ब) लाल दिव्याच्या गाडीतून फिरण्यासाठी

क) भरपूर पगार वन सुरक्षितता मिळते म्हणून

ड) असामाजिक व अनैतिक प्रवृत्तींचा बिमोड करण्यासाठी

१०२विश्वासच्या अयुष्यावर कोणत्या तीन महनीय व्यक्तींचा प्रभाव पडला ?

अ)महात्मा गांधी, पंडित नेहरू , डॉ. आंबेडकर

ब)शिवाजी महाराज, शाहू महाराज, महात्मा फुले

क)शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक,महात्मा फुले

ड)शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर

-------------------------------------------------------------------------------